# "सरोजिनी नायडू" (भारताची कोकिळा)

**प्रा. रेडेकर सुरेखा जोतिबा**
समीर गांधी कला महाविद्यालय माळशिरस.
जि. सोलापूर.

**प्रस्तावना:**

भारताला इंग्रजांच्या पारतंत्र्यातून बाहेर काढण्यासाठी पुरुषांबरोबर क्रांतिकारी महिलांनी हातभार लावला. स्त्रियांनी स्वातंत्र्यलढ्यात मोलाची कामगिरी बजावली. त्यामध्ये डॉ. अँनी बेंझट, सुचेता कृपालिनी, राणी लक्ष्मीबाई, पंडिता रमाबाई, राणी गिडालु, बिना दास यासारख्या अनेक स्त्रियांचा समावेश होता. त्यापैकीच क्रांतिकारी महिलांमधील एक स्त्री म्हणजे सरोजिनी नायडू होय. सरोजिनी नायडू स्त्रियांच्या हक्कासाठी व पुरुषांबरोबर स्त्रियांना समानतेचा दर्जा मिळावा. यासाठी लढल्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक थोर अग्रगण्य कार्यकर्त्या व कवयित्री म्हणून सरोजिनी नायडू यांचे नाव इतिहासात प्रसिद्ध आहे. लहानपणापासूनच त्यांना कविता लिहिण्याची आवड होती.

**उद्दिष्टे:**

1.सरोजिनी नायडू यांचे राजकीय कार्य अभ्यासणे.
2. सरोजिनी नायडू यांचे स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीतील कार्याचा आढावा घेणे.
3. सरोजिनी नायडू यांनी स्त्रियांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
4. सरोजिनी नायडू यांचे कवयित्री म्हणून केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

सरोजिनी नायडू या प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक आणि कवयित्री होत्या. सरोजिनी नायडू भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी आणि राज्याच्या राज्यपाल पदावर विराजमान झालेल्या पहिल्या महिला होत्या. सरोजिनी लहान मुलांवर कविता रचत असत. प्रत्येक कवितेत वेगळा अंदाज होता. म्हणूनच त्यांना "नाईटिंगेल ऑफ इंडिया" असे संबोधले जाते. भारतातील सर्वात कर्तुत्ववान महिलांच्या यादीत सरोजिनी नायडू या पहिल्या क्रमांकावर आहेत. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आणि जगाने त्यांना एक मौल्यवान रत्न मानले. सर्व भारतीयांच्या सरोजनी आदराचे प्रतीक आहेत. भारतीय महिलांसाठी आदर्श आहेत. मागासलेल्या अनेक रूढी परंपरा, अशिक्षित अशा समाजाला प्रबोधन करणे फार जिकिरी चे काम होते. ते पार पाडण्याचे कार्य सरोजिनी नायडू यांनी केले. भारताला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी विशेष असा मोलाचा वाटा सरोजिनी नायडू यांचा आहे. त्या काळात त्या आणि त्यासारख्या स्वातंत्र्य सेनानी होत्या. म्हणूनच आपण आज "आझादी का अमृत महोत्सव" साजरा करत आहोत.

**जन्म :**

वरद सुंदरी देवी, डॉक्टर अघोरनाथ चटोपाध्याय या दांपत्याच्या पोटी 13 फेब्रुवारी फेब्रुवारी 1879 मध्ये हैदराबाद मध्ये जन्म झाला. मूळ कुटुंब बंगाली होते. वडील वैज्ञानिक आणि डॉक्टर होते. आई वरदसुंदरी देवी बंगालीत कविता लिहिणाऱ्या कवयित्री होत्या. आठ मुलांपैकी सरोजीनी सर्वात मोठ्या होत्या. वीरेंद्रनाथ त्यांचे एक भाऊ एक क्रांतिकारक होते. त्यांनी बर्लिन समितीच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यांचा दुसरा भाऊ हरिन्द्रनाथ हा कवी आणि अभिनेता होता. आणि 1937 मध्ये एका इंग्रजाने त्यांची हत्या केली.

**शिक्षण :**

सरोजिनी लहानपणापासूनच चांगल्या विद्यार्थिनी होत्या. त्यांचे उर्दू, तेलगू, इंग्रजी, आणि बंगाली भाषेवर प्रभुत्व होते. वयाच्या 12 व्या वर्षी मद्रास विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेत अव्वल स्थान पटकावले. आणि त्यांची खूप प्रशंसा आणि नाव मिळाले. सरोजिनींच्या वडिलांची इच्छा होती की, त्यांनी शास्त्रज्ञ व्हावे, किंवा गणिताचा अभ्यास सुरू ठेवावा. परंतु त्यांनी कवितांना प्राधान्य दिले. सरोजिनी नायडूंनी एकदा त्यांच्या गणिताच्या पुस्तकात तेराशे ओळींची एक कविता लिहिली. ती

वाचून त्यांच्या वडिलांना आश्चर्य वाटले. आणि त्यांनी प्रति तयार केल्या. आणि मोठ्या प्रमाणात वितरित केल्या. ते हैदराबादच्या नवाबलाही दाखवले. ते पाहून आनंदाने त्यांनी सरोजिनींना परदेशात शिकण्यासाठी शिष्यवृत्ती दिली. लंडन मधील किंग्स कॉलेजमध्ये आपले शिक्षण सुरू ठेवले. त्यानंतर सरोजिनी नायडू यांनी केंब्रीज विद्यापीठातील गिराँन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सरोजिनींचा कविता वाचनाचा आणि रचण्यातला उत्साह तो त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला होता. तो कॉलेजमध्ये असतानाही कायम होता.

**वैवाहिक जीवन :**

सरोजिनी डॉक्टर गोविंद राजुलू नायडू यांना त्यांच्या पदवी पूर्व वर्षांमध्ये भेटल्या. आणि ते दोघे पदवीधर झाल्यावर त्यांची मैत्री झाली सरोजिनी वयाच्या 19व्या वर्षी शिक्षण पूर्ण केल्यानंतर आंतरजातीय1897 विवाह त्यांच्या पसंतीनुसार व वडिलांच्या संमतीने झाला. त्याकाळात दुसऱ्या जातीत लग्न करणे हा गुन्हा मांडला जात होता. तरीही वडिलांनी धाडस करून समाजाची पर्वा न करता विवाह लावून दिला. त्यांना चार मुले होती. त्यापैकी एक पद्मजा सरोजिनींच्या पायावर पाय ठेवून 1961 मध्ये पश्चिम बंगालच्या राज्यपाल बनल्या. व त्या आईप्रमाणे कवयित्री सुद्धा होत्या.

**सरोजिनी नायडू यांच्या प्रसिद्ध कविता :**

सरोजिनी नायडू यांनी लग्नानंतर ही आपले काम चालू ठेवले होते. इंग्रजी भाषेत ही त्या कविता करायच्या पण त्यांच्या कवितांनी भारतीय वारसा अधोरेखित केला आहे. प्रसिद्ध कविते पैकी काही कविता त्या म्हणजे इंडियन डान्सर, द इंडियन, इंडियन लव्ह सॉग्स, इंडियन विव्हस, द फॉरेस्ट नाईट फॉल सिटी इन हैदराबाद, सती, द सोल प्रेयर, आणि इतर काही कविता त्या काळात प्रचंड लोकप्रिय होत्या.

**सरोजिनी नायडू स्वातंत्र्य सैनिक :**

सरोजिनी नायडू एका सुसंस्कारित घरात जन्माला आल्या होत्या. राजकारणाचे व चळवळीचे बाळकडू त्यांना बालपणीच मिळाले होते. संसारातून बाहेर पडून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. मुळात त्या कवयित्री असल्याने त्यांच्या काव्यातला राष्ट्रीय दृष्टिकोन क्रांतिकारक,या राष्ट्रीय विचारामुळे त्या चांगल्या प्रसिद्धीस आल्या. त्यातच गोपाळ कृष्ण गोखले, एम. ए. जिन्हा, अँनी बेझंट, लोकमान्य टिळक, नेहरू, महात्मा गांधी वगैरे जेष्ठ नेत्यांच्या सानिध्यात आल्या. त्यांनी होमरूल लीगसाठी सर्व भारतभर दौरे काढले. व व्याख्याने दिली. गोखले हे गांधींचे व सरोजिनी नायडूंचे राजकीय गुरू होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव सरोजिनी नायडूंवर पडला होता. त्यांनी पुढे गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले. हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. हैदराबाद मध्ये प्लेगची साथ चालू होती. त्यावेळी लोकांची फार मदत केली. त्याबद्दल त्यांना "कैसर इ हिंद" या पदकाने गौरव केला.पण पुढे जालियनवाला बाग हत्याकांडच्या निषेधार्थ त्यांनी ही पदवी सरकारला परत केली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी मुक्तीसाठी स्वातंत्र्यलढ्यात जोमाने भाग घेतला. त्या काळात स्त्रिया खूप मागास होत्या. आणि एक रुढी परंपरा यात त्या गुरफटलेल्या होत्या. महिलांना त्यांच्या हक्कासाठी शिक्षित केले. विविध राज्ये, शहरे, गावोगावी जाऊन त्यांनी देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी दौरे केले लोकांचे मतपरिवर्तन करण्यास त्यांची मदत झाली.

**सरोजनी नायडू यांची राजकीय कारकिर्द :**

सरोजिनी नायडू 1925 मध्ये कानपूर मधून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी लढल्या. आणि जिंकल्या. त्या पहिला महिला होत्या. 1927 मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेच्या संस्थापक म्हणून सहभागी होत्या. त्यांनी शांततापूर्ण निषेध करण्यासाठी 1928 मध्ये युनायटेड स्टेट्सचा दौरा केला. दक्षिण आफ्रिकेतील आणि भारतीय काँग्रेसची1929 ची बैठक सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. स्वातंत्र्यानंतर पहिल्या महिला राज्यपाल सरोजनी नायडू होत्या. महात्मा महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून आपले कार्य आटोपून इंग्लंडला आले होते. इंग्लंडमध्येच गांधीजींचा व त्यांचा परिचय झाला. दोघांचे राजकीय गुरू एकच असल्याने त्यांच्या विचारात साधर्म्य आले. गांधीच्या भारतीय राजकारणातील आगमनाने काँग्रेस केवळ शहरापूर्ती मर्यादित न राहता. आता ती जन आंदोलनाच्या रूपाने पुढे आलेली होती. म्हणूनच गांधीजींच्या प्रत्येक सत्याग्रहात सरोजिनी नायडूंचा सहभाग होता. त्यामध्ये असहकार आंदोलन याचा उल्लेख करावा लागेल. गांधीजींच्या अटकेनंतर

1930 च्या कायदेभंग चळवळीमध्ये धरासना सत्याग्रहाची जबाबदारी यशस्वीरित्या सरोजिनी नायडूंनी पेलली होती. 1942 च्या भारत छोडो आंदोलनात त्यांचा सहभाग होता. त्यांनाही अटक करून इंग्रज सरकारने आगाखान पॅलेस मध्ये ठेवले होते. तेथील कैद्यांची मातृवत सेवा सरोजिनी नायडू यांनी केली.

**स्त्रीविषयक भूमिका व कार्य :**

गांधीजींच्या स्त्री मुक्तीच्या विचारांचा प्रभाव सरोजिनी नायडू वर होता. म्हणून देशाच्या उन्नतीसाठी स्वातंत्र्यासाठी स्त्री पुरुष समानता असणे फारच गरजेचे आहे. असे त्यांना वाटत होते. 1908 मध्ये भरलेल्या विधवा विवाह परिषदेत त्यांनी स्त्रियांच्या चळवळीचा पाया घातला. आणि खऱ्या अर्थाने तेथूनच स्त्री चळवळीचा प्रारंभ झाला. ऑल इंडिया वुमन्स कॉन्फरन्स च्या माध्यमातून स्त्रियांना प्रगल्भ बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पडदा पद्धतीच्या विरोधात सरोजिनी नायडू होत्या. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार असावा असे त्यांचे मत होते. स्त्री मुक्ती साठी त्यांनी विविध ठिकाणी व्याख्याने देऊन समाज प्रबोधन केले. अशा प्रकारे सरोजिनी नायडू यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी अपार कष्ट केले. 2 मार्च 1949 रोजी सरोजीनी नायडू यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

**निष्कर्ष :**

1.स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी होण्यासाठी स्त्रियांना प्रेरित केले.

2 आपल्या कवितेच्या व व्याख्यानाच्या माध्यमातून सरोजिनी नायडू यांनी समाज प्रबोधन केले.

3 सरोजिनी नायडू यांची राजकीय कारकीर्द यशस्वी ठरली.

4 सरोजिनी नायडू यांनी एक स्वातंत्र्य सैनिकाची भूमिका उत्तमरीत्या पार पाडली.

5 नायटेंगल वूमन व भारतीय कोकिळा म्हणून सरोजिनी नायडू नावारुपाला आल्या.

6 स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यानंतर सामाजिक सुधारणा होण्यास मदत झाली.

7 भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यास सरोजनी नायडू यांचा महत्वाचा वाटा आहे.

**संदर्भ:**

1.भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, डॉ.अनिल कठारे, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद.

2 स्त्री शिक्षणाची वाटचाल, डॉ. बाबर, महाराष्ट्र राज्य शिक्षण,1968.

3 हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, डॉ. जयसिंगराव पवार, फडके प्रकाशन.

4 आधुनिक भारत का इतिहास, बिपिन चंद्र, ओरियंट ब्लॅकसंवँन, प्रायव्हेट लिमिटेड, हैदराबाद.

5 आधुनिक भारत, बिपिनचंद्र, डॉ. एम. व्ही. काळे के सागर पब्लिकेशन.